315

**निवडणुक महत्वाचे**

**आदेश**

क्रमांक/अका-1/नपाप्र/कावि/ /17
जिल्हाधिकारी कार्यालय,यवतमाळ
दिनांकः-11.07.2017.

**वाचा:-** मा.राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र यांचे पत्र क्रं./रानिआ/नप2017/प्रं.क्र.11/का-6 दिनांक 13.06.2017.

**//००//**

ज्याअर्थी यवतमाळ जिल्ह्यातील नगरपरिषद पांढरकवडाच्या प्रारुप प्रभाग रचनेस संदर्भीय आदेशानुसार जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. प्रारुप प्रभाग रचना प्रसिध्द करण्यापूर्वी नगरपरिषद पांढरकवडाची नागरी सभा आयोजित करुन सोडत पध्दतीने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील स्त्रीयांसाठी राखीव ठेवावयाच्या जागा, नागरीकांच्या मागासवर्गासाठी (त्यातील स्त्री आरक्षणासह) राखीव ठेवावयाच्या जागा व उर्वरीत स्त्रीयांसाठी ठेवावयाच्या जागा यांचे आरक्षण निश्चित करावे व ही सोडत जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली करण्यांत यावी असे आदेशीत केले आहे.

त्याअर्थी नगरपरिषद पांढरकवडाच्या वरील प्रमाणे प्रभागरचना, आरक्षण व सोडत ईत्यादी पासून अंतीम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहिवर नियंत्रन ठेवण्याकरीता खालील प्रमाणे उप-विभागीय अधिकारी यांना मी याव्दारे प्राधिकृत करीत आहे.

| अ.क्रं. | नगरपरिषदेचे नाव | नगरपंचायतीचा वर्ग | नियुक्त प्राधिकृत अधिकारी | सभा घेण्याचे ठीकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | पांढरकवडा | क | श्री. संदिप अपार ,<br>उपविभागीय अधिकारी , केळापुर. | जिद्देवार भवन , न.प. पांढरकवडा |

उपरोक्त अधिकारी यांनी , राज्य निवडणुक आयोगाचे वरील वाचामधील पत्रात दिलेल्या निर्देशाचे पालन करावे व आरक्षणाची सोडत काढण्याकरीता दिनांक 20.07.2017 (गुरुवार) रोजी सकाळी 11.00 वाजेपासून जिद्देवार भवन , न.प. पांढरकवडा येथे सभा आयोजित करावी. सोडतीच्या वेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा सोडतीसाठी येणा-या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा.तसेच प्रत्येक प्रभागाच्या सोडतीच्या आधी त्या प्रभागाचा क्रमांक व त्यांच्या चर्तुसिमा जाहीर कराव्यात.त्याच प्रमाणे सोडतीसाठी फिरणारा पारदर्शक ड्रम वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्यांचा आकार १५ सेंमी.X १५ सेंमी. पेक्षा जास्त नसावा चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरून दिसणार नाही याची दक्षता घ्यावी त्यावर लावण्यात येणारे रबर बॅंड एकाच रंगाचे असावे. शक्यतोवर सोडतीचे प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही.वर (विनामुल्य) करावे. तसेच सोडतीपूर्वी दिनांक 19.07.2017 रोजी सोडतीची रंगीत तालीम फक्त संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत घेण्यात यावी.

**जिल्हाधिकारी यवतमाळ**

प्रतिलीपीः-

1. मा.आयुक्त ,राज्य निवडणुक आयोग महाराष्ट्र नविन प्रशासन भवन ,मंत्रालयासमोर मादाम कामा रोड,मुंबई - 32 यांना माहितीस्तव सादर.
2. मा.आयुक्त तथा संचालक,नगर परिषद प्रशासन संचालनालय,शासकीय परिवहन सेवा इमारत, 3 रा मजला सरपोचखानवाला मार्ग ,वरळी मुंबई -30 यांना माहीती करीता सादर
3. मा. प्रादेशिक संचालक,नगर परिषद प्रशासन अमरावती विभाग अमरावती यांना माहितीस्तव सादर.
4. उपविभागीय अधिकारी केळापुर यांना राज्य निवडणुक आयोगाचे उक्त पत्राचे प्रतिसह माहीती तथा तात्काळ उचित कार्यवाहीस अग्रेषित त्यांना निर्देशित करण्यांत येते की, आरक्षणाची सोडत ही उक्त राज्य निवडणुक आयोगाचे पत्रात दिलेल्या निर्देशानुसार काढण्यांत यावी.
5. मुख्याधिकारी ,नगरपरिषद पांढरकवडा यांना राज्य निवडणुक आयोगाचे उक्त पत्राचे प्रतिसह माहिती तथा तात्काळ उचित कार्यवाहीस अग्रेषित त्यांना निर्देशित करण्यांत येते की, आरक्षणाची सोडतीकरिता सभेचे आयोजन करुन उपविभागीय अधिकारी यांना आवश्यक ते सहकार्य करावे, तसेच आरक्षणाच्या सोडतीसाठी सोबत जोडलेल्या नमुण्यात प्रसिध्दी द्यावी.

**जिल्हाधिकारी यवतमाळ**